महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**मंत्रालय (मुख्य इमारत), चौथा मजला,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मुंबई - ४०० ०३२.**

**दूरध्वनी क्र. ०२२-२२८२१४९४** E-mail ID : decomp.pwd@maharashtra.gov.in

क्र.: सी.ओ.एम.२०२५/प्र.क्र.२३/संगणक कक्ष दिनांक १३ जून, २०२५.

प्रति,

सर्व मुख्य अभियंता,
सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,
मुंबई/कोकण/पुणे/नांदेड/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर/राष्टीय महामार्ग (सा.बां.)

**विषय:** सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नवीन संकेतस्थळावर माहिती अपलोड करण्याबाबतच्या कार्यपद्धती (SOP) आणि महत्त्वाचे मुद्दे.

महोदय/महोदया,

आपणास कळविण्यात येते की, सार्वजनिक बांधकाम विभागासाठी नवीन अद्ययावत संकेतस्थळ (website) तयार करण्यात आले आहे. या नवीन संकेतस्थळावर विभागाशी संबंधित माहिती, परिपत्रके, निविदा आणि इतर आवश्यक माहिती नियमितपणे अपलोड करणे आवश्यक आहे, जेणेकरून जनतेला व संबंधित घटकांना विभागाच्या कामकाजाची माहिती सहज उपलब्ध होईल.

नवीन संकेतस्थळावर माहिती अपलोड करण्याची प्रक्रिया सुव्यवस्थित आणि अचूक असावी यासाठी खालीलप्रमाणे प्रमाणित कार्यपद्धती (Standard Operating Procedure - SOP) आणि काही महत्त्वाचे मुद्दे निश्चित करण्यात आले आहेत. या कार्यपद्धतीचे काटेकोरपणे पालन करावे.

**नवीन संकेतस्थळावर माहिती अपलोड करण्यासंबंधीची प्रमाणित कार्यपद्धती (SOP):**

१. क्षेत्रीय कार्यालयांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील, त्यांच्याशी संबंधित कोणतीही माहिती (उदा. प्रकल्प अहवाल, छायाचित्रे, नकाशे, परिपत्रके, निविदा सूचना इ.) नवीन संकेतस्थळावर अपलोड करण्यासाठी पाठविताना मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये असावी.

माहिती अचूक, अद्ययावत आणि सार्वजनिकरीत्या उपलब्ध करण्यासाठी योग्य स्वरूपात (उदा. माहिती शक्यतो पीडीएफ (PDF), छायाचित्रे जेपीजी (JPG) स्वरूपात असावीत) तसेच दस्तऐवज स्पष्ट आणि वाचण्यायोग्य असावेत. पाठविण्याच्या फाईलला उचित आणि समजण्यास सोपे नाव (File Naming) द्यावे.

माहिती पाठवताना सायबर सुरक्षेच्या नियमांचे पालन करावे. कोणत्याही संशयास्पद ई-मेलव्दारे माहिती पाठविण्यात येऊ नये तसेच कोणतीही संशयास्पद attachments पाठवू नये.

२. क्षेत्रीय कार्यालयांनी संकलित केलेली माहिती प्रथम संबंधित कार्यकारी अभियंता यांच्याकडे पडताळणीसाठी सादर करावी. कार्यकारी अभियंत्यांनी सादर केलेल्या माहितीची सत्यता, अचूकता आणि संकेतस्थळावर अपलोड करण्यायोग्य असल्याची खात्री करावी. कार्यकारी अभियंत्यांनी पडताळणी केलेली माहिती संबंधित अधीक्षक अभियंता यांच्याकडे पुढील पडताळणीसाठी पाठवावी. अधीक्षक अभियंत्यांनी माहितीचे अधिक व्यापक स्तरावर पुनरावलोकन करून त्यात कोणतीही त्रुटी, अपूर्णता किंवा आवश्यक बदल नाहीत याची खात्री करावी. मुख्य अभियंत्यांनी माहितीची अंतिम तपासणी करून ती संकेतस्थळावर अपलोड करण्यासाठी योग्य आहे याची खात्री करून मंजुरी द्यावी.

३. सदर माहिती संबंधित कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता, मुख्य अभियंता यांच्या अधिकृत ईमेल आयडीवरूनच (Official Email ID) पुढील स्तरावर पाठविण्यात यावी. सदर माहिती नोडल अधिकारी(संकेतस्थळ) तथा सह सचिव (सेवा) यांना ईमेल आयडी: pwdwebsiteupdate@gmail.com वर पाठवावी. तसेच सदर माहिती पाठवताना, पूर्वी नमूद केलेल्या सर्व अधिकाऱ्यांच्या अधिकृत ईमेल आयडीवरूनच ती पाठवली गेली असल्याची खात्री करावी.

४. मुख्य अभियंत्यांकडून मंजूर झालेल्या माहितीचे मंत्रालयातील संबंधित उप सचिव / सह सचिव यांनी पुनर्विलोकन करून आवश्यकतेनुसार सूचना कराव्यात. अंतिमत: विभागातील माहिती व तंत्रज्ञान सल्लागार यांचेमार्फत नोडल अधिकारी यांची मान्यता प्राप्त करुन घेऊन सदर माहिती संकेतस्थळावर अपलोड करण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी.

या सूचनांचे आणि कार्यपद्धतीचे काटेकोरपणे पालन केल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नवीन संकेतस्थळावर अद्ययावत आणि अचूक माहिती वेळेत उपलब्ध होईल, ज्यामुळे विभागाचे कामकाज अधिक पारदर्शक आणि कार्यक्षम होईल.

आपली,

(रोहिणी भालेकर)
नोडल अधिकारी तथा सह सचिव (सेवा)
सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) सर्व अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,